मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# पेत्र आणि प्रार्थनेचे सामर्थ्य



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Janie Forest

रूपान्तरकार: Ruth Klassen

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2014 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

येशू विषयी दुसऱ्यांना सांगण्यासाठी प्रेषित पेत्र संपूर्ण देशात प्रवास करित फिरला. एके दिवशी, लोद नावाच्या गावात तो एका मनुष्याला भेटला, त्याला लकवा झाल्यामुळे तो आठ वर्षांपासून अंथरुणावर पडला होता. त्याला पेत्राने म्हटले, "येशू ख्रिस्त तुला बरे करित आहे, ऊठ व स्वतः आपले अंथरुण नीटनेटके कर." तेंव्हा तो तत्काळ उठला.



ज्या लोकांनी हे पाहिले
ते लोक प्रभूकडे वळले.



यापो गावाजवळ लोक दुःखात होते. दुर्कस नावाची एक ख्रिस्ती बाई काही वेळापूर्वी मरण पावली होती. तिचे हितचिंतक दुःखाने तिच्या अंत्ययात्रेची तयारी करीत होते, मग तिला माडीवरच्या घरात ठेवून सर्वांनी एकत्रित शोक केला.





परंतू दुर्कसच्या मित्रांना कळले की पेत्र त्यांच्या विभागात आला आहे. आमच्याकडे येण्यास उशिर करु नका अशी विनंती पेत्राला त्यांनी केली. जेंव्हा तो त्या माडीवरच्या घरात गेला, तेंव्हा तेथे रडत उभ्या असलेल्या विधवा बाईनी त्यांच्यासाठी दुर्कसने बनविलेले अंगरखे व वस्त्रे दाखविले. सर्वजण रडत होते.

परंतू पेत्राने त्या सर्वांना बाहेर घालवून दिले, आणि गुडघे टेकून प्रार्थना केली. आणि मग त्या प्रेताकडे वळून म्हणाला, "दुर्कस उठ" तेंव्हा तीने डोळे उघडले आणि पेत्राला पाहून ती उठून बसली.





मग त्याने तिला हात
देऊन उठविले; आणि
पवित्र जनांना व विधवांना
बोलावून त्यांच्यापुढे तिला
जिवंत असे उभे केले. हे
सर्व यापोमध्ये माहित झाले;
आणि पुष्कळांनी प्रभूवर
विश्वास ठेवला.


यापोमधील समुद्राजवळ असलेल्या घरात पेत्र बरेच दिवस राहिला.
एके दिवशी पेत्र धाब्यावर प्रार्थना करण्यासाठी गेला. जर त्याने
शहराच्या भिंतींकडे पाहिले असेल तर त्याच्याकडे येत
असलेल्या तिन प्रवाशांना
त्याने पाहीले असावे.


जो देवाची भक्ति करत असे त्या कर्नेल्य नावाच्या रोमन सैनिकाच्या घरातील हे लोक सेवक होते. कर्नेल्याने पेत्राचा शोध घेण्यास माणसे पाठीवले होते, कारण एका दुताने त्याला
दृष्टांतात असे म्हटले होते की, "पेत्राला बोलावण्यासाठी माणसे पाठिव, समुद्र किनाऱ्यावर शिमोन चांभाराच्या घरात तो वास्तव्यास आहे. तू काय करावे त्याविषयी तो तुला सांगेल. "

घराच्या धाब्यावर पेत्र प्रार्थना करित असतांना, देवाने त्याला दृष्टांत दिला.
त्यात त्याला मोठ्या चांदव्यासारखे चार कोपरे धरुन सोडलेले एक पात्र पृथ्वीवर
उतर आहे असे दिसले. त्यात प्राणी
आणि पक्षी होते.



पेत्राने त्यांना "निषिध्द् आणि अशुध्द्" असे म्हटले आहे. याचा अर्थ असा की धर्मपुढारी लोकांनी त्यांना खाण्यास मनाई केलेले होते. तेवढ्यात त्याला एक वाणी ऐकू आली, "पेत्रा, ऊठ; मारुन खा."



पेत्र म्हणाला, नको, नको, प्रभू;
"कारण निषिध्द् आणि अशुध्द् असे
कांहि मी कधींहि खाल्ले नाही." मग
दुसऱ्यांदा अशी वाणी झाली की,
"देवाने जे शुध्द् केले आहे तें तूं
निषिध्द् मानू नको." हे असे तीन
वेळा झाले आणि मग ते पात्र
आकाशांत वर घेतले गेले.



या दृष्टांताचा अर्थ काय आहे हे पेत्राला कळले नाही. याविषयी तो विचार करीतच होता की देवाने त्याला म्हटले, तिन माणसे त्याचा शोध करित आहेत आणि त्याने त्यांच्या संगती जावे.



त्याला बोलावून आणण्यास पवित्र
देवदुताने कर्नेल्यला सांगितले आहे
असे जेंव्हा त्या तिन माणसांनी पेत्राला
सागितले तेंव्हा पेत्राला कळून आले
की परमेश्वर या गोष्टीत त्याला
चालवित आहे. दुसऱ्या दिवशी
पेत्र व त्याचे सहा मित्र
कर्नेल्याच्या घरि गेले.





त्या यहुदी नसलेल्या मनुष्याच्या घरि जात असतांना – देव सर्व मनुष्यांवर प्रीति करतो – सर्व राष्ट्रांतील मनुष्यांनी येशूला जगाचा तारणारा असे ओळखावे अशी देवाची इच्छा आहे हे कदाचित त्याला समजू लागले असावे. जेंव्हा पेत्र तेथे आला तेंव्हा कर्नेल्य त्याला सामोरा गेला आणि त्याने त्याच्या पाया पडून त्याला नमन केले.

पेत्राने कर्नेल्यला म्हटले, "उभे राहा, मीहि मनुष्यच आहे." मग त्याने घरात जमलेल्या सर्वांना म्हटले, "यहुदी मनुष्याने अन्य जातीच्या मनुष्याबरोबर निकट संबंध ठेवणे किंवा त्याच्याकडे जाणे येणे ठेवणे हे त्याच्या रितीरिवाजाविरुध्द् आहे."



"तथापि कोणाहि मनुष्याला निषिध्द् किंवा अशुध्द् म्हणूं नये असे देवाने मला दाखविले आहे."




येशू हा देवाचा पुत्र आहे तो वधस्तंभावर मरण पावला आणि तिसऱ्या दिवशी मरणातून जिवंत होऊन संपूर्ण जगाचा तारणारा ठरला आहे, असे पेत्राने त्या यहुदीतर लोकांना सांगितले. मग ऐकणाऱ्या सर्वांवर पवित्र आत्मा उतरला आणि ते देवाचा महिमा वर्णू लागले. पेत्रासंगती आलेल्या सहा मित्रांना हे पाहून आश्चर्य वाटले. पेन्टिकॉस्टच्या दिवसाप्रमाणे येथे घडले होते. परराष्ट्रीयांवरहि पवित्र आत्म्याचा वर्षाव झाला.


मग पेत्राने येशूमध्ये नविन विश्वासणाऱ्यांचा बाप्तिस्मा केला.

यहुदी नसलेल्या लोकांना जाऊन भेटल्यामुळे यरुशलेमेतील खिस्ती लोक पेत्राला बोलले. म्हणून स्वतः पेत्र व कर्नेल्य या दोघांनी देखिल प्रार्थनेच्या समयी जे दृष्टांत पाहिले होते त्याविषयी त्यांना सांगितले. जेंव्हा त्यांनी या गोष्टी ऐकल्या तेंव्हा यरुशलेमेतील खिस्ती विश्वासणारे शांत राहिले. आणि त्यांनी देवाच्या नावाचे गौरव केले. देवाची प्रीति सर्वांसाठी आहे हे मंडळ्या प्रार्थनेच्या व्द्ारे दाखवितात.



पेत्र आणि प्रार्थनेचे सामर्थ्य

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

प्रेषित ९-१२

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16